Kasegaon Education Society's
**RAJARAMBAPU INSTITUTE OF TECHNOLOGY, RAJARAMNAGAR**
**(An Autonomous Institute)**
Post- Sakharale, Tal. Walwa, Dist. Sangli. PIN – 415414 (Maharashtra)
Website: www.ritindia.edu. E-mail: director@ritindia.edu

# Scholarship Notice / स्कॉलरशिप नोटीस २०२१–२२
(*Only for* *CAP admitted* *Students*)

दिनांक:– २९/१२/२०२१

महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये शिकत असलेल्या **ST /SC / VJNT / OBC / SBC / Open category/Minority** च्या विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, जे विद्यार्थी विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत त्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज **www. mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरती **१०/०१/२०२२ पर्यंत भरायचे आहेत.**

## याबाबतची माहिती खालीलप्रमाणे

१. आपली शिष्यवृत्ती मिळणेसाठी आपल्या आधारकार्डला आपला बॅक खाते क्रमांक लिंक असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी www.uidai.gov.in – My adhar- adhar services- Chek adhar bank linking Status या संकेतस्थळावरती जावून चेक करावे. ज्या विद्यार्थ्यांचे बॅक खाते लिंक दिसत नसेल व ज्या विद्यार्थ्यांचे अद्याप बॅक खाते नसेल त्यांनी Indian Post Bank मध्ये आपले खाते उघडावे.

२. ***सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून आपले बोनाफाईड सर्टिफिकेट घ्यावे व ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरताना फी पेड च्या ठिकाणी रु. ०.०० रक्कम भरावी व आपले बोनाफाईड सर्टिफिकेट अपलोड करावे.***

३. डिप्लोमा इंजिनिअरींग मधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा अर्ज भरणेसाठी Cast Validity ची आवश्यकता नाही.

४. विद्यार्थ्यांचे ॲडमिशन फक्त प्रवर्गामधून झालेमुळे (उदा. SC, ST, NT, SBC, OBC, Open, EWS, Minority, DFS., Phycial Handicap) त्यांना फी सवलत मिळत नाही त्यासाठी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरावाच लागेल.
जे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असूनही ऑनलाईन अर्ज भरणार नाहीत त्यांना महाविद्यालयाची पुर्ण फी भरावी लागेल.

५. जे विद्यार्थी होस्टेल च्या शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत त्यांनी आपला शिक्षण फी सवलतीचा ऑनलाईन अर्ज भरताना त्यामध्ये होस्टेल तपशील भरणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना होस्टेलच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येणार नाही.

६. शासनाकडून कोणत्याही एकाच शिष्यवृत्तीचा लाभ घेता येतो. (फक्त होस्टल ची शिष्यवृत्ती फी साठीच्या शिष्यवृत्तीसोबत घेता येईल) अन्य कोणत्याही शासकीय शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

Rajarambapu Institute of Technology, Sakharale 415414, Rajaramnagar

**रजिस्ट्रार**

Kasegaon Education Society's
**RAJARAMBAPU INSTITUTE OF TECHNOLOGY, RAJARAMNAGAR**
**(An Autonomous Institute)**
Post- Sakharale, Tal. Walwa, Dist. Sangli. PIN – 415414 (Maharashtra)
Website: www.ritindia.edu. E-mail: director@ritindia.edu

# Scholarship Notice / स्कॉलरशिप नोटीस २०२१–२२

(*Only for* *CAP admitted* *Students*)

दिनांक:– २६/१२/२०२१

महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये प्रवेशित फक्त **Open / EWS / SEBC category** च्या विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, जे विद्यार्थी **Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC)** शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत त्यांना **डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता** या योजनेसाठी अर्ज करता येतो त्यासाठी त्यांनी आपले ऑनलाईन अर्ज **www. mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरती **१०/०१/२०२२ पर्यंत भरावा.**

**योजनेच्या नियम, अटी व पात्रता खालीलप्रमाणे:–**

१. विद्यार्थ्यांचे ॲडमिशन कॅप राउंड मधून असणे आवश्यक आहे.
२. अर्जदार हा महाविद्यालयाच्या वसतीगृहामध्ये अथवा महाविद्यालयाच्या परिसरामध्ये खाजगी जागेमध्ये भाडयाने राहत असला पाहिजे.
३. अर्जदाराने त्याच्या ई.बी.सी. शिष्यवृत्ती अर्जामध्ये होस्टेल तपशील भरणे अत्यावश्यक आहे अन्यथा त्याला डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी अर्ज करता येणार नाही.
४. महाविद्यालयाच्या वसतीगृहामध्ये राहत असलेल्या विद्यार्थ्यांनी होस्टल बोनाफाईल अपलोड करावे व जे विद्यार्थी खाजगी घरामध्ये महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वास्तव्यास आहेत त्यांनी त्यांचे घरमालकासोबतचा भाडेकरार नोटरी करुन अपलोड करावा. (रु.१०० च्या स्टॅम्पवर नोटरी करणे आवश्यक आहे)
५. अर्जदारचे वडील हे अल्पभुधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजुर असणे आवश्यक आहे (वडील हयात नसतील तर आईचा दाखला चालेल) तसेच अल्पभुधारक दाखला हा तहसिलदार, नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकरी अथवा त्या समकक्ष आधिका–याचा आवश्यक आहे. (**तलाठी यांचेकडील दाखला किंवा फक्त ७/१२ उतारा चालणार नाही तसेच आजोबाच्या नावचा अल्पभुधारक दाखलाही चालणार नाही तसेच भुमिहीन दाखलाही चालणार नाही**)
६. ज्या विद्यार्थ्यांच्या पालंकांचे सन २०२०–२१ साठीचे उत्पन्न ६ लक्ष रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे व ते महाविद्यालयाच्या वसतीगृहामध्ये राहत असतील व त्यांचे वडील/ आई अल्पभुधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजुर नसतील तरीही त्यांना सदर योजनेसाठी अर्ज करता येईल. त्यासाठी त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये अल्पभुधारक किंवा नोदणीकृत मजुर नाही असे भरावे.

Rajarambapu Institute of Technology, Sakharale 415414

**रजिस्ट्रार**

**टीप–**

**१.जे विद्यार्थी विहित मुदतीत अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती मिळणार नाही त्यामुळे त्यांच्या या होणा–या नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.**

**२. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी त्याच्या आधारकार्डला बॅंक खाते लिंक असणे आवश्यक आहे व सदरचा लिंकीग स्टेटस www.uidai.gov.in या संकेतस्थळावरती चेक करुन बघायचा आहे. (बॅंकेत विचारायचे नाही)**